E.M

Estate/52/90
19-1-90

जा.क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे यांचे कार्यालय.
दिनांक:-

प्रति

सर्व शिक्षणाधिकारी,
[प्राथमिक]
जिल्हा परीषद, पुणे विभाग.

- 9 JAN 1990

विषय:-सन १९८९-९० या शैक्षणिक वर्षात प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.....

वरील विषयाचे संदर्भात या कार्यालयाच्या समक्रमांक दिनांक १६.१०.८९ अन्वये सन १९८९.९० या शैक्षणिक वर्षात ज्या खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत निर्गमित केलेले आदेश कृपया पहावेत.

सदर शाळांपैकी ज्या शाळांना इंग्रजी माध्यमासाठी परवानगी देण्यात आली आहे त्यांचे बाबतीत पुढील अटही वाचण्यांत यावी. व कार्यवाही करावी.

[" इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर तसेच भाविष्यात माध्यम बदलता येणार नाही. या अटीवर परवानगी देण्यांत येत आहे. "

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे--१ करिता

प्रत:- सर्व प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका , प्राथमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभाग, यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत:- मा. सचिव, [illegible]
यांना माहितीसाठी अग्रेषित.

19-1-90

FM

तत्परतेने.

मा.क/प्रा/प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक-

16 OCT 1989

प्रति,

शिक्षणाधिकारी
[प्राथमिक विभाग]
जिल्हा परिषद, ...पुणे.....

विषय – जून १९८७ पूर्वी सुरु असलेल्या अनधिकृत खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.....

सन १९९९-२००० चा जो नवीन

संदर्भ – शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसीईएस २०९९/१९९५/प्राशि-३, दिनांक ५.१०.९९ चे पत्र.

अपरोक्त विषयासंबंधीचे आपले कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घालेल्या सर्व साधारण अटींना अधिन राहून खालील नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविल्या ठिकाणी व व माध्यमातून जून १९८७ पासून इ. १ ली ते सन ८७-८८ या शैक्षणिक वर्षापासून प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासाठी प्राथमिक शाळा सुरु करण्यास खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

संस्थेचे नांव	शाळेचे नांव व ठिकाण	इयत्ता	माध्यम.
द्यानदीप्ती एजुकेशन सोसायटी पुणे	गिरीनगर डोंगरे	—	इंग्रजी

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथ. शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहीत केलेल्या अटींनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहीत केलेल्या नियमानुसार विहीत वयोमर्यादेत व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहीत केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

.... २ ....

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघालेल्या आदेशांचे उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

५] ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खालील नमूद केलेल्या बाबींची खात्री करून घेवून मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

[१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त, अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमांखाली नोंदली आहे.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी अेखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबत-च्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत अेखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

६] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

७] संस्थेने विहीत नमुन्यात माहिती अद्ये केला आहे. [यापूर्वी अद्ये केला नसल्यास तो करुन घ्यावा.]

८] शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू केल्याबाबत प्रत्येक शैक्षणिक कर्मचाऱ्यांकडून रु. १००/- इंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी वरीलप्रमाणे पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ कस्तिा.

स्थळप्रतीवर शि.अ. सं पु. वि
यांची सही आहे.

प्रत- प्रशासनाधिकारी /महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ
..... जिल्हा ..... यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत- मा. ~~उपसचिव~~ सचिव ...प्राथ.शि.व क्री.वि.मंडळ...गिरीनगर डोणजे ..पुणे.....
यांना माहितीसाठी अग्रेषित.